# राजहंस वराह व्यवसाईक सहकारी संस्था म. लातूर

(अवसायनात)

**अभिहस्तांकिती - श्री.एस.पी. माळी मो.नं.- ९४२२७५३३९१**

## ई-निविदाद्वारे स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता जाहीर सुचना

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २१ (अ) २ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी अभिहस्तांकिती, राजहंस वराह व्यवसाईक सहकारी संस्था म. लातूर (अवसायनात) या संस्थेची खालील प्रमाणे वर्णन केलेली मालमत्ता माझ्या ताब्यात आहे. सदर मालमत्ता मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) लातूर यांचेकडील आदेश जा.क्र. जिदुविअ/सनि (दुग्ध)/लातूर/१०३९/२०१९ दि.१७.१०.२०१९ अन्वये अपसेट प्राईस रक्कमेस व विक्रीस मान्यता दिलेली आहे. अभिहस्तांकिती यांच्याकडील स्वमालकीची व ताब्यात असलेली मालमत्ता ई-निविदाद्वारे विक्रीकरिता जाहीर विक्री सुचना प्रसिद्ध करीत आहे.

### विक्री करावयाच्या मालमत्तेचे वर्णन व तपशील

| अ.क्र | मालमत्तेचे ठिकाण | अपसेट प्राईस | इसारा ठेव रक्कम (१० %) |
|---|---|---|---|
| १. | मौजे महाराणा प्रताप नगर ता.जि. लातूर<br>गट नं. ६७ मधील जमीन ०.९० हे. आर.<br>१. २ रुम - १० X १०<br>२. १ रुम - १० X २०,<br>३. गोडाऊन १ - २० X २०<br>व खुली जमीन | १२७४४४८०/- | १२७५०००/- |

**अटी / शर्ती :-**

१. सदर मालमत्तेची निविदा बोली फक्त **www.tldccb.com** या संकेतस्थळाच्या माध्यमातुन दि.१४.०१.२०२० ते २७.०१.२०२० पर्यंत सकाळी ०९.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत विस्तारासह सादर करता येईल.

२. वरील मिळकतीचा लिलाव **जे आहे, जेथे आहे आणि जे काही आहे, तेथे आहे** या तत्त्वाने ऑनलाईन करण्यात येईल. सदर लिलाव या **www.tldccb.com** संकेतस्थळावर करण्यात येईल.

३. निविदा ऑनलाईन पद्धतीने भरावयाची आहे. निविदाकर्त्यास सुरक्षा ठेव रक्कम जमा केल्यानंतर मुद्रित करणे आवश्यक आहे. **www.tldccb.com** वर (वैयक्तिक निविदा समाप्ती तारीख, आणि वेळ, वेबसाईट आणि वृत्तपत्रावर प्रकाशित करण्यापुर्वी) वैयक्तिक खात्यातील सर्व दस्ताऐवजांसह स्वाक्षरी आणि अटी आणि अट क्रमांक ४ नुसार पृष्ठे स्कॅन करणे आवश्यक राहील.

४. निविदादारास वैयक्तिक खात्यास **www.tldccb.com** संकेतस्थळावर सुरक्षा ठेव रक्कम पुरावा म्हणून स्कॅन कॉपी प्रदान करावी लागेल.

..२..

५. बोली सादर करण्यापुर्वी बोलीदाराने साक्षेप मिळकतीच्या संदर्भातील त्याच्याद्वारे देय थकबाकी आणि हक्क, नामधिकार, हितसंबंधात खात्री करुन घ्यावी आणि त्यानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही.

६. सुरक्षा ठेव अनामत रक्कम अभिहस्तांकिती, राजहंस वराह व्यवसाईक सहकारी संस्था म. लातूर (अवसायनात) लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा टिळकनगर, लातूर या बँकेच्या नांवे डी.डी. च्या मार्गाने सुरक्षा अनामत रक्कमेसह दि.२७.०१.२०२० रोजी पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. किंवा अभिहस्तांकिती, राजहंस वराह व्यवसाईक सहकारी संस्था म. लातूर (अवसायनात) लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा टिळकनगर, लातूर या बँकेच्या चालु खाते क्र.100210131014407, IFSC Code- IBKL0497LDC मध्ये RTGS / NEFT मार्फत दि.२७.०१.२०२० पर्यंत जमा करता येईल. बोलीधारकास सुरक्षा ठेव रक्कम व के.वाय.सी. ही मालमत्तेनिहाय स्वतंत्रपणे भरणा करावी लागेल.

७. संस्थेची मालमत्ता दि.१४.०१.२०२० ते दि.२७.०१.२०२० रोजी सुट्टीचे दिवस वगळता सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत संस्थेच्या कार्यस्थळी समक्ष पाहता येईल. सदर जमीन, शेड बांधकाम मौजे महाराणाप्रताप नगर, लातूर ता.जि. लातूर येथे औसा - नांदेड रिंगरोडवर सारोळा, सोनवती रोड जवळ आहे.

८. अपसेट प्राईस किंमतीच्या खाली प्रस्ताव / बोली विचारात घेतल्या जाणार नाहीत.

९. प्रयोज्य मुद्रांक शुल्क / अतिरिक्त मुद्रांक शुल्क / हस्तांतर आणि नोंदणी प्रभार फक्त खरेदीदारांनाच भरावे लागतील.

१०. वरील मिळकतीशी संबंधित विद्यमान व भविष्यातील सर्व वैधानीक / अवैधानीक थकबाकी, कर, दर, निर्धारण, प्रभार शुल्क, दावे इत्यादी याची संबंधित सोसायटी / प्राधिकरणाकडे निश्चिती व खात्री करुन घेण्याची जबाबदारी फक्त खरेदीदाराची राहील.

११. ई-निविदा उघडण्याच्यावेळी जास्त बोलीची रक्कम जाहीर करुन आवश्यकता असेल अभिहस्तांकिती यांचेकडून इतर निविदाधारकांना बोली करण्याची संधी देण्यात येईल.

१२. सुरक्षा अनामत रक्कम ई-निविदा उघडण्याच्या तारखेनंतर ज्याची निविदा स्विकारली नाही किंवा मंजूर केली नाही केवळ त्यांची परत केली जाईल. तसेच सुरक्षा अनामत रक्कमेवर कसल्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१३. यशस्वी बोलीधारकांनी उर्वरीत रक्कम ( सुरक्षा अनामत रक्कम वजा जाता ) निबंधकाच्या मंजूरीस अधिन राहून ३० दिवसाच्या आत अभिहस्तांकिती, राजहंस वराह व्यवसाईक सहकारी संस्था म. लातूर (अवसायनात) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा टिळकनगर, लातूर या बँकेच्या चालु खाते क्र.100210131014407, IFSC Code- IBKL0497LDC मध्ये RTGS / NEFT मार्फत जमा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम यशस्वी बोलीधारकांनी विहीत कालावधीत उर्वरीत रक्कम भरणा करणेस कसुर केल्यास जमा केलेली सुरक्षा ठेव अनामत रक्कम कोणत्याही पुर्वसुचनेशिवाय जप्त करण्यात येईल.

१४. लिलावास अंतिम मान्यता नाकारण्याचा / स्विकारण्याचा अधिकार अभिहस्तांकिती यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच कोणतेही कारण न देता व पुर्वसुचना न देता लिलाव रद्द वा स्थगित अथवा पुढे ढकलण्याचा अधिकार अभिहस्तांकिती यांनी राखून ठेवलेला आहे.

१५. सदर स्थावर मालमत्ता विक्री प्रक्रिया ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील अवसायन व अभिहस्तांकितीबाबतचे तरतुदीस अनुसरुन राबविण्यात येत आहे. तसेच अंतिम बोलीस मान्यता देण्याचे अधिकार मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पदुम), लातूर यांना राहतील.

१६. मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (पदुम) लातूर यांचे अंतिम मंजूरीनंतर विक्री प्रमाणपत्र फक्त खरेदीदार / अर्जदाराच्या नांवे जारी करण्यात येईल व कोणत्याही अन्य नावाने दिली जाणार नाही.

१७. संस्थेची मालमत्ता खरेदीदारास अपसेट प्राईसच्या (अपसेट प्राईस मालमत्ता विक्री) २ % सर्व्हीस चार्ज + नोंदणी फिस + जीएसटीसह एकूण रक्कम रु.------------/- खरेदीदाराने शासन मान्य ई-टेंडरींग / ई-ऑक्शन एजन्सी मे.कुणाल शहा, सॉफ्टवेअर, अहमदाबाद यांना जमीन विक्रीची प्रक्रिया होणेपुर्वी रक्कम अदा करावी लागेल.

१८. सदर नोटीस ही संस्थेच्या स्वमालकीची मालमत्ता विक्री करणेसंबंधाने ३० दिवसाची आगाऊ सुचना समजण्यात यावी.

## **विशेष सुचना**

बोलीदारांनी त्यांच्या स्वतःच्या हितसंबंधात शेवटचे मिनिट / सेकंदाला बोली करणे टाळावे. अभिहस्तांकिती किंवा सेवा पुरवठादार कोणतीही त्रुटी / कसुर (इंटरनेट फेल्युअर, वीज जाणे इ.) करिता संस्था जबाबदार राहणार नाही. अशा आकस्मीक घटना टाळण्यासाठी बोलीदारांना बॅकअप पावर सप्लाय अशा सर्व आवश्यक व्यवस्था / पर्याय करण्याची विनती करण्यात येत आहे. ज्यामुळे त्यांना यशस्वीपणे लिलावात सहभागी होणे शक्य होईल.

**दिनांक :**

**वेळ :**

**स्वाक्षरीत /-**

**अभिहस्तांकिती**

**राजहंस वराह व्यवसाईक सह. संस्था म. लातूर**